महाराष्ट्र पोलीस

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**
नवीन प्रशासकीय इमारत, गांधी नगर सोलापूर
दुरध्वनी क्रमांक:- 0217-2744613
EmailID cp.solapur@mahapolice.gov.in

जा.क्र.कक्ष 1(4)/ केदीभत्ता निविदा/दरपत्रके/2024-467- सोलापूर शहर दि.25 /01/2024

**विषय :- कच्चे कैदी यांना जेवण पुरविणेबाबतच्या वार्षिक निविदा मागविण्याची जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

--00--

**आदेश** :-

सोलापूर शहरातील, सर्व अधिकृत खानावळ/उपहारगृह चालक यांना कळविण्यात येते कि, या आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस ठाण्यातील पोलीस कोठडीत कच्च्या कैदेतील आरोपींना दिनांक **01/04/2024** ते दि.**31/03/2025** या कालावधीत दोन वेळेचे शिजविलेले अन्न पुरविणेबाबत दरपत्रक मागविण्यात येत आहेत. बंदी कैद्यांना दोन वेळेस पुरविण्याबाबतच्या अन्नाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | प्रमाणे प्रति दिनी आहार (ग्रम) |
|---|---|---|
| 1 | गव्हाची चपाती किंवा ज्वारीची भाकरी | 250 ग्रॅम |
| 2 | दाळ | 100 ग्रॅम |
| 3 | भाजी | 300 ग्रॅम |
| 4 | आठवडयातुन एक वेळेस दाळे / भाजी ऐवजी मटन | 75 ग्रॅम |
| 5 | आजारी कैद्यास जेवणा ऐवजी दुध | 500 ML |
| 6 | स्त्री आरोपीस तीन वर्षाखालील मुल असल्यास वरील जेवणाशिवाय दुध | 200 ML |

**सदर दरपत्रकांचा नमुना सोबत जोडलेला आहे**. त्या मधील नमुद प्रमाणे अचुक माहिती भरुन प्रतिदिन व प्रतिडोई **( दोन वेळेसच्या दरासह )** रक्कम रु. 80/- आतील प्राप्त दरामधून कमी दराचे दरपत्रक स्विकृत करण्यात येतील. सर्व सविस्तर माहीती **सर्व परवाने व आवश्यक कागदपत्रांच्या** छायांकित प्रती सोबत जोडुन दिनांक 16.02.2024 रोजी 11.00 वाजेपर्यत सिलबंध लखोटयात वपोनि जेलरोड पोलीस स्टेशन येथे सादर करण्यात याव्यात. प्राप्त दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा.पोलीस उप-आयुक्त (मुख्या.) यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे. दरपत्रक नाकारल्याबाबत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. सोबत :- निविदेबाबतचा नमुना फॉर्म

**मा. पोलीस आयुक्त,**
**यांचे मान्यतेने.**

**( अजित बोऱ्हाडे )**
पोलीस उप-आयुक्त, (मुख्या)
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचे करीता.

प्रति, पोलीस निरीक्षक, सायबर सेल पोलीस टाणे, सोलापूर शहर.
2/- यांनी सदरची प्रत कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दी करावी.

varshik karar keedi ahar Bhatta

Scanned by CamScanner

पोलीस ठाण्यातील पोलीस कोठडीस कच्चा कैदेतील आरोपींना दि.०१.०४.२०२४ ते ३१.०३.२०२५
या कालावधीत दोन वेळेचे शिजवलेले अन्न पुरविण्याबाबतचे
दरपत्रकाचा विहीत नमुना

दि. .०१.२०२४

प्रति,

मा. पोलीस आयुक्त,
सोलापुर शहर.

महोदय,

मी श्री / श्रीमती ---------------------------------------------------------------------------------------
दरपत्रक सादर करतो की, आपल्या अधिपत्याखाली पोलीस ठाण्यामधील कच्चा कैदेतील आरोपींना दि. ०१.०४.२०२४ ते ३१.०३.२०२५ या कालावधीत दररोज एका आरोपीस दोन वेळचे शिजविलेले अन्न पुरविण्याबाबातचे जाहिरातीस अनुसरुन त्यामध्ये नमूद केलेल्याप्रमाणे प्रतिदीन/प्रतिडोई दोन वेळेस रु.---------/- (अक्षरी ------------------------------------------------------------) या दराने अन्न पुरवठा करण्यास तयार आहे.

२/- सदरचा अन्न पुरवठा करण्यासंबधच्या सर्व अटी मला मान्य असुन त्या मला वंधनकारक आहेत. त्याबाबत माझी कोणत्याही प्रकारची तक्रार नाही.

१. मी कोणतीही तक्रार न करता वर नमुद केलेला कालावधीमध्ये विहीत केलेल्याप्रमाणे प्रति दिन योग्य प्रकारे शिजविलेले अन्न मुंबई सब जेल मॅन्युअल (सुधारीत आवृत्ती १९५४) नियम क्र. १६२ प्रमाणे पुरवठा करीन.

२. माझे दरपत्रक स्विकारली गेल्यास मी प्रत्येक पोलीस ठाण्याप्रमाणे अनामत रक्कम रुपये १०००/- (अक्षरी एक हजार फक्त ) ही वेगवेगळी आगाऊ भरण्यास तयार आहे.

३. माझ्याकडे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९६१ नियम ६ अन्वये नोंदणी दाखल असून त्याची छायांकित प्रमाणित प्रत सोबत जोडलेली आहे.

४. मी आरोपींना दिलेल्या कालवधीम प्रमाणाप्रमाणे आरोपींना जेवण वेळेवर पुरविले नाहीतर रु. १००/- दंड करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

५. माझेकडून अन्न पुरवठा करणेसंबधी पोलीस ठाण्याकडुन तक्रार प्राप्त झालेस माझे दरपत्रक रदद होईल व मी भरलेली रक्कम सरकार जमा होईल याची मला पूर्ण जाणीव आहे.

६. माझेकडे मा. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचेकडून घेतलेला हॉटेल परवाना असून तो दिनांक. / / पर्यंत नुतनीकरण करून घेतलेला आहे. त्याची छायांकिंत प्रमाणित प्रत जोडलेली आहे.

९. मला शिजविलेले अन्न पोलीस ठाण्यातील कैदयांना पुरविण्यासंबधीचा ----------वर्षाचा अनुभव आहे.

१०. दरपत्रक स्विकारण्याचे व नामंजूर करण्याचे अधिकार हे पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय) यांना आहेत याची मला जाणीव आहे.

सोबत :- एकुण ---------कागदपत्रे जोडलेली आहेत.

आपला विश्वासु

varshik karar keedi ahar Bhatta

Scanned by CamScanner